कोल्हापूर (स्वायत्त)


# विवेक

२०१९-२०२०

## विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)

NAAC Reaccredited with 'A' Grade (CGPA -3.24)
Star College by DBT, GOVT. of India



INTERNATIONAL YEAR OF
PLANT HEALTH
2020

PROTECTING PLANTS
PROTECTING LIFE

कोल्हापूर (स्वायत्त)

।। ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार ।।
–शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

## विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)

**NAAC Reaccredited 'A' Grade with CGPA 3.24**
**STAR College by DBT, Govt. of India**

# विवेक

५४ वा
वार्षिक अंक
२०१९-२०

।। कला ।। क्रीडा ।। भाषा ।। साहित्य ।। संस्कृती ।।



**प्रा. भाऊ काशिनाथ गोसावी**
संपादक

**प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर**
अध्यक्ष

# संपादकीय

कोल्हापूर (स्वायत्त)

## ज्ञानरूपी मंदिरातूनी प्रकाशदीप उजळती



ज्ञानरूपी मंदिरातूनी
दीप प्रकाशाचे उजळती।
शिक्षणाच्या वाटेवरती
जीवनाचे मार्ग गवसती ॥

**सृजन, रसिक वाचक हो !**

महाविद्यालयीन कामकाजाचा वेध घेणारा, भाषा, साहित्यकला आणि संस्कृतीचा अविष्कार असणारा 'विवेक' वार्षिक अंक (शैक्षणिक वर्ष २०१९-२०) आपल्या हाती सुपूर्द करीत आहे.

यंदाच्या शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच महापूराच्या नैसर्गिक आपत्तीने अनेकांचे संसार उद्‌ध्वस्त केले. सर्वत्र शहरी भागात व गाववस्त्यात पाणी शिरल्याने सातारा-कोल्हापूर-सांगली परिसरातील सारेच जनजीवन विस्कळीत झाले. अनेकांचे मदतीचे हात पुढे आले. समाजातील सारेच पुन्हा ताठ कण्याने उभे रहात असताना कोरोनासारख्या दुर्धर आजाराने संपूर्ण जगालाच हादरवून सोडले. कोरोनाची ही महामारी कधी संपेल याची सारेचजण वाट पहात आहेत. सध्या सारी आर्थिक व्यवहाराची घडी विस्कळीत झाली असून शाळा, महाविद्यालयेही बंद आहेत. शासन, पोलीसयंत्रणा व आरोग्यखाते आपल्यापरीने या संकटांचा सामना करून माणसांना धैर्य देत आहेत.

शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी १९५४ साली श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची स्थापना करून शहरी व ग्रामीण भागातील मुलामुलींना शिक्षणाच्या संधीतून 'जीवनाचा ज्ञानप्रकाश दिला. डॉ. बापूजी साळुंखे यांची शिकवण बुद्ध, कबीर, फुले, राजर्षी शाहू व आंबेडकरवादी विचाराचा वारसा जतन करणारी आहे. सत्य, शील, प्रामाणिकता, त्याग, पिळवणुकीस आळा ही पंचशील तत्त्वे अंगी बाणवून जीवनाची सार्थकता शिक्षणातून साधता आली पाहिजे. हा विचार त्यांनी रुजविला. त्या ज्ञानरूपी शिक्षणमहर्षींना व त्यांच्यामागे सतत सावली बनून साथ सोबत करणाऱ्या संस्थामाता श्रीमती सुशिलादेवी साळुंखे यांना विनम्र अभिवादन !

श्री स्वामी विवेकानंद शिक्षणसंस्था गेली ६६ वर्षे शैक्षणिक क्षेत्रात ज्ञानप्रसाराची भरीव कामगिरी करून राष्ट्रहित आणि सामाजिक बांधिलकी जपत आली आहे. आज संस्थेची सुमारे ४०६ शैक्षणिक केंद्रे शिक्षणप्रसाराचे कार्य करीत आहेत. या संस्थेचे अध्यक्ष नामदार चंद्रकांतदादा पाटील यांचे पाठबळ आम्हांस सतत लाभत आहे. संस्थेचे कार्याध्यक्ष मा. प्राचार्य अभयकुमार साळुंखे व संस्थेच्या सचिवा प्राचार्या सौ. शुभांगी गावडे यांच्या शिक्षणविस्ताराच्या कार्याने ही संस्था अधिक जोमाने उभी राहात आहे.



कोल्हापूर येथील विवेकानंद महाविद्यालयाने सातत्याने आपली शैक्षणिक गुणवत्ता सिद्ध करत कला, क्रीडा व साहित्य क्षेत्रातही उल्लेखनीय यश संपादन केले आहे. महाविद्यालयास स्वायत्त (Autonomous) दर्जा प्राप्त असून नवीन विषयाचा अभ्यासक्रम व विविध व्यवसायाभिमुख कोर्सेसना सुरुवात करण्यात आली आहे. या कॉलेजमध्ये ज्युनियर व सिनीयर मिळून ८००० हून अधिक विद्यार्थी बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी., बी.व्होक., बी.बी.ए., बी.सी.ए., बी.सी.एस्., एम्.एस्सी., एम्.कॉम., एम.बी.ए., बी.लिब्., एम्.लीब्. इ. ज्ञानशाखांत शिक्षण घेत आहेत.

सन १९९८ साली विद्यापीठाचे तत्कालीन कुलगुरु डॉ. धनागरे यांनी गुणवत्तेवर आधारित मेरीट स्कॉलरशीप्स सुरू केल्या आणि तेव्हापासून आजअखेर सलग २० वर्षे हे महाविद्यालय विद्यार्थी शिष्यवृत्ती गुणवत्तेबाबत पहिले राहिले आहे. विज्ञान शाखेकडे शिकणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांना महाराष्ट्र शासनाकडून इन्स्पायर स्कॉलरशिप मंजूर झाल्यास संबंधित विद्यार्थी बी. एस्सी. भाग १ पासून सलग तीन वर्षे ही स्कॉलरशिप प्राप्त करतो. या महाविद्यालयाने सलग पाच वर्षे प्रतिवर्षी रुपये ८०,००० प्रमाणे चार वर्षांची शिष्यवृत्ती प्राप्त केली आहे. या महाविद्यालयाच्या ६० विद्यार्थ्यांनी २ कोटी ४० लाख इतकी रक्कम आजपर्यंत मिळवून महाविद्यालयाचा नावलौकीक वाढविला आहे.

महाविद्यालयाने आजतागायत अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडू घडविले आहेत. यावर्षी मलेशिया येथे झालेल्या बुद्धिबळ स्पर्धेत सम्मेद जयकुमार शेटे, बी.कॉम. भाग ३ याने तृतीय क्रमांकाचे यश संपादन करून आंतरराष्ट्रीय मास्टर होण्याचा बहुमान प्राप्त केला. शिवाजी विद्यापीठ अंतर्गत क्रीडास्पर्धेत १५ खेडाडूंनी वेस्ट झोन व ऑल इंडिया विद्यापीठीय क्रीडास्पर्धेत सहभाग नोंदवला. ज्युनियर महाविद्यालयाच्या आठ खेळाडूंनी राष्ट्रीय स्तरावर तर तीन खेळाडूंनी केंद्र सरकारतर्फे घेण्यात आलेल्या 'खेलो इंडिया' स्पर्धेसाठी सहभाग घेतला. ज्युनियर महाविद्यालयाच्या ७२ खेळाडूंनी राज्यस्तरावरील क्रीडास्पर्धेत सहभाग नोंदविला.

सन २०१३-१४ पासून ५ वर्षे कोल्हापूर जिल्ह्यातील 'बेस्ट कॉलेज इन स्पोर्टस्' साठी महाराष्ट्र राज्य युवक सेवा संचलनालय, पुणे यांचेकडून दिले जाणारे रुपये एक लाखाचे खास अनुदान मिळविणारे विवेकानंद हे एकमेव कॉलेज आहे.

महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाचे कार्यही उल्लेखनीय असेच आहे. या विभागातील कलाकारांनी 'युवा महोत्सव', 'पुरुषोत्तम करंडक', 'राज्यनाट्य स्पर्धा' यामध्ये यश संपादन करून तसेच सह्याद्री वाहिनीवर लोकनृत्य सादरीकरण करून महाविद्यालयास लौकिक प्राप्त करून दिला आहे.

शिवाजी विद्यापीठ नियतकालिक स्पर्धेमध्ये 'विवेक' या नियतकालिकाने सलग ५ वेळा प्रथम व एकवेळ द्वितीय येण्याचा सन्मान प्राप्त केला आहे.

या महाविद्यालयास NAAC बेंगलोर यांचेकडून सलग दोन वेळा 'ए' मानांकन प्राप्त झाले आहे. तसेच विद्यापीठ अनुदान आयोग (U.G.C.) नवी दिल्ली यांनी महाविद्यालयाचा CPE या स्कीममध्ये सलग दोन वेळा समावेश केला आहे. यावर्षी महाविद्यालयाने आय.एस.ओ. (ISO 9001-2015) मानांकन मिळविले आहे. या महाविद्यालयाने स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून अनेक IAS, IPS, DYSP, Deputy Collector व सैन्यदलातील कमिशनर ऑफिसर देशाला दिले आहेत.

लेखणीच्या कलमाने साहित्य व विविध कलांची निर्मिती होते. या अंकाच्या जडणघडणीचे काम करताना अनेकांचे पाठबळ व प्रोत्साहन लाभले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. वाय होनगेकर यांचे वेळोवेळी मार्गदर्शन लाभले. तसेच प्राचार्य डॉ. युवराज भोसले यांचेही विशेष सहकार्य लाभले. संपादक मंडळातील सर्व सहकाऱ्यांनी हा अंक अधिक दर्जेदार व माहितीपूर्ण करणेसाठी विशेष परिश्रम घेतले. अंकातली अंतर्गत रचना, फोटोग्राफी, कलादालन यासाठी प्रा. किरण पाटील, प्रा. एस्. एस्. कुंडले, प्रा. एस्. एम. रूईकर, प्रा. संग्राम देसाई, प्रा. राहुल इंगवले यांचे बहुमोल सहकार्य लाभले. महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. डी. बी. पाटील, सर्व प्राध्यापक व कार्यालयीन कर्मचारी या सर्वांचे मी ऋण व्यक्त करतो.

या अंकाचे छपाईकाम सुबक व दर्जेदार होण्यासाठी मोलाचे सहकार्य करणारे श्री मुरारी मुद्रणालयाचे श्री. प्रदीप पडवळे व तेजस पडवळे, कॉम्प्युटर विभागाचे काम पाहणारे श्री. सुनिल सुतार यांचेही आभार व्यक्त करतो.

या अंकासाठी लेखन करणारा व कलादालन समृद्ध करणारा विद्यार्थीवर्ग, गुरुदेव या सर्वांनाच मनापासून धन्यवाद देतो !



**प्रा. भाऊ काशिनाथ गोसावी**
**संपादक**

विवेकानंद कॉलेज

कोल्हापूर (स्वायत्त)

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर वार्षिक नियतकालिक स्पर्धेत सातत्याने क्रमवारीत स्वत:चा अभिजातपणा ठसविलेले सर्जनशील वार्षिक नियतकालिक.



# विवेक


## संपादक मंडळ

अध्यक्ष :
**प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर**

संपादक :
**भाऊ काशिनाथ गोसावी**

**विभागीय संपादक : वरिष्ठ महाविद्यालय**

| | |
|---|---|
| मराठी विभाग | प्रा. बी. के. गोसावी |
| हिंदी विभाग | डॉ. डी. आर. तुपे |
| इंग्रजी विभाग | प्रा. एस. एम. रुईकर |
| विज्ञान विभाग | प्रा. एस. एच. नदाफ |

**विभागीय संपादक : कनिष्ठ महाविद्यालय**

| | |
|---|---|
| मराठी विभाग | प्रा. ए. के. पाटील |
| हिंदी व उर्दू विभाग | प्रा. एम. ए. पिरजादे |
| इंग्रजी विभाग | प्रा. सौ. एस. एस. भोसले |
| संस्कृत विभाग | प्रा. सौ. एम. ए. शिंदे |
| कन्नड विभाग | प्रा. सौ. यु. आर. हिरकुडे |

**जाहिरात विभाग :**

प्रा. किरण पाटील
प्रा. एम. आर. नवले
प्रा. व्ही. बी. कदम
डॉ. सौ. नीता पाटील (ग्रंथपाल)
श्री. एच. एस. साळुंखे (सहाय्यक ग्रंथपाल)

श्री. सी. बी. दोडमणी (प्रबंधक)
श्री. ए. एस. पवार (कार्यालयीन अधिक्षक)
श्री. बी. आर. करपे
श्री. एस. एच. दुर्गुळे
श्री. रवी चौगुले (सेवकवर्ग प्रतिनिधी)

- **मुखपृष्ठ संकल्पना :**
  श्री. प्रकाश भोपळे
  बी. व्होक, ग्राफिक डिझाईन, भाग-३

- **संपादन सहाय्य :**
  प्रा. डॉ. प्रदिप पाटील
  प्रा. बी. के. गावीत
  प्रा. सुनिल शिंदे

- **छायाचित्रण व अंतर्गत रचना विभाग :**
  प्रा. संतोष कुंडले
  प्रा. राहुल इंगवले
  प्रा. एस. व्ही. देसाई
  प्रा. एस. व्ही. उपळावीकर
  प्रा. एस. व्ही. मालगावकर
  प्रा. राजश्री पाटील

- **अहवाल विभाग :**
  डॉ. एस. आर. कट्टीमनी

- **मुद्रक :**
  श्री. मुरारी मुद्रणालय, कोल्हापूर.
  ९८९०९६७०७७



तळहाताच्या नाजुक रेषा
कुणी वाचाव्या, कुणी पुसाव्या;

तांबुस निर्मल नखांवरी अन्
शुभ्र चांदण्या कुणी गोंदाव्या !

–बा. सी. मर्ढेकर



# मराठी विभाग

## वरिष्ठ



**प्रा. भाऊ काशिनाथ गोसावी**

संपादक

आमचं नाव कर.''

बाबा तिची पाठ थोपटत बोलले.

आपण वाचल्याची तिला खात्री झाली. तिने एक श्वास टाकला. स्मित हास्य केलं आणि पुढे येणाऱ्या सन्डेच्या एक्स्ट्रा लेक्चर्सची ती वाट पाहू लागली.

अशी त्यांची सन्डेची लेक्चर्स नियमानं सुरू होती. त्या दोघांच्याही घरी याबाबत कोणतीही कुणकुण कोणालाच नव्हती. सगळं कसं कुशलमंगल चाललं होतं. पण एक दिवस मोठा प्रसंग घडला. पावसाचे दिवस होते. पन्हाळ्याच्या खाली येत असताना त्यांची भरधाव बाईक डोंगराच्या उतारावर घसरली आणि दोघेही समोरच्या दगडावर आदळले.

अपघात इतका मोठा होता की दोघांनाही चांगलाच मार बसला होता. त्याचा हात तर तिचा पाय फॅक्चर झाला. लोकांनी पोलिसात याची नोंद केली आणि दोघांनाही कोल्हापूरच्या इस्पितळात हालवलं. पोलिसांनी दोघांच्या घरच्यांना ही वार्ता कळवली. दोघेही इस्पितळात घायाळ होऊन पडले होते आणि इकडे त्या दोघांचे कुटुंब आपापसात भांडत होते. डॉक्टरांनी दोघांच्याही कुटुंबांना समजावून सांगितले,

''ही आजकालची पोरं आई-बापांच्या डोक्याला ताप असतात. शिक्षणाच्या नावाखाली अशीच भटकत असतात स्वतःला अपघात करून घेतात आणि आई-बापाचंही त्यांच्याकडं लक्ष नसतं. असुद्या आता पोरांना काही शिक्षा करू नका आणि पोलिस केस मागे घ्या. व प्रकरण मिटवून टाका.''

दोघांनाही डिसचार्ज मिळाला. बबलीच्या आईला वाटलं पोरीचं हात पिवळं करावं. इकडं अभीलाही त्यांच्या आईबाबांनी त्याला आपल्या बिझनेसमध्ये गुंतवून ठेवलं. तेव्हापासून त्यांची सन्डेची एक्स्ट्रा लेक्चर्स बंद झालीत.... कॉलेजचं ॲडमिशन रद्द होऊन ती दोघं घरात बसलीत.

◆◆

# मुलगी

इटुकल्या-पिटुकल्या पावलांनी
अन् गुबगुबीत गालांनी
अंकुरा-समान एक कळी
जन्मा येते

तिच्या गोड-गोड हास्याने
अन् बोलक्या वाणीने
बालपणात ती सर्वांना
आपलं वेड लावते

तिच्या वाजणाऱ्या
छुम-छुम पैंजणाचे
कानात घुमतात निनाद
तशी ती मोठी होते

छकुली जेंव्हा शाळेत जाते
ती फुलाप्रमाणे उमलू लागते
अवखळ मनाने बागडू लागते
भवऱ्याप्रमाणे गरगर फिरते

आता कॉलेजला जाऊ लागते,
मित्र-मैत्रीणींसोबत वावरू लागते
वयात आलेल्या वेलीप्रमाणे बहरू लागते
बहरताना स्वतःलाच
कुंपण घालून सावरू लागते

मुलगी असावी घरचा सन्मान
मुलांप्रमाणे मुलींना द्यावा मान



संयोगिता संजय पाटील
बी. एस्सी. भाग-२



संयोगिता पाटील
बी. एस्सी. भाग-दोन

# माझी आजी



कधीच वाटले नव्हते.... मी माझ्या आजीविषयी लिहू शकेन. कारण प्रत्येकाची आजी ही भूतकाळात जगत असते. तिचा 'भूतकाळ जगायला आम्हाला आवडेल.' पण म्हणतात ना जुन्या लोकांनी जगलेला भूतकाळ आणि तरुणांनी त्याला जोडलेला वर्तमानकाळ म्हणजे एक नवी पिढी असते. आजीचा भूतकाळ तुम्हाला सांगण्यासाठीच मी ही गोष्ट लिहिते. आजीची गोष्ट.....

माझ्या आजीचं नाव विजयमाला. आजीचं हे नाव किती सुंदर आहे. ज्यांना कधीच हरण्याचं भय नाही अशी माझी आजी विजयमाला. आमच्यासमोर आणि कधी आजोबांच्यासमोरही तिनं हात टेकले नाहीत. आता तिच्याबद्दल सांगायचं झालं तर ती खूप स्वच्छताप्रिय होती. ती एकदा कपडे धुवायला, अंघोळीला गेली की बाकीच्यांना नो एन्ट्री. न्हाणीघरात तिनं अंग घासायला नदीचा खरबरीत गडगोटाच आणून ठेवला होता. एक तासभर तिची आंघोळ चालायची. माझं कॉलेज असल्याने मी न्हाणीघराबाहेर ओरडायची, दंगा करायची, पण आजी न्हाणीघर काय सोडत नव्हती. ती आतून ओरडायची,

''सय्ये! माझ्याशी गाठ हाय! माझी आंघोळ झाल्याबिगर मी काय बाहीर येणार नाय.''

''अगं आज्जे ! माझं कॉलेज हाय!''

आजी ऐकत नसल्याने मी गॅस गिझरचे बटन बाहेरून बंद करायचे.

आजी आतून शिव्या घालायची, मी बाहेरून दंगा करायचे. आजी बाहेर आली की पळून जायचे, अनेक प्रसंग आठवतात, की माझी आजी मला अनेकदा छळते, अडवणूक करते.

आंघोळ झाली की तिची तासभर देवपूजा असायची, देव्हाऱ्यातले सगळे देव ती धुवून काढायची, पुसून घ्यायची, चकचकीत करायची, त्यांना योग्य जागेवर बसवायची, आपणही थपकल मारून देवासमोर बसायची. मोठमोठ्याने मंत्रआरती

> आजी म्हणजे घरकुलातलं झाड
> व मुलगी म्हणजे रोपटं असतं...
> हे नातं गहनगुढ असतं.

म्हणायची. हातातली घंटी जोरात वाजवायची. देवाचा नैवेद्य होईपर्यंत ती देवघरात असायची.

ती कामात पटाईत होती, पण खूप हळूहळू काम करायची. मी अगदी तिच्यावरच गेले आहे. एखादं काम चालू करायला लागले की माझी मम्मी मला म्हणायची की आजीचा विडा उचललास. आजी कधीकधी आंघोळ दुपारी दोन-तीनला सर्व कामे आवरून झाली की मग करायची. माझे आजोबा शिक्षक, एका शाळेचे मुख्याध्यापक होते, आता निवृत्त झाले. ते दिवसभर शाळेत असायचे आणि रात्री भजनाला जायचे. ते देवभक्त आहेत. पांडुरंगाचे मोठे भक्त आहेत. सकाळी उठले की गावातील मंदिरांमध्ये जाऊन येणार आणि मगच दूध पिणार, भजनासाठी आजोबा रात्रीचे कुठे का असेनात, तेंव्हा माझी आजी एकटी झोपायची. घरात कोणीही नसायचं, खूप धाडसी होती. तिच्यासारखं कोणीच नव्हतं. तिला तीन भाऊ आणि ही 'विजयमाला' भावंडांमध्ये सर्वात मोठी. लहानपणी भावांच्या शिक्षणासाठी हिने स्वतःची शाळा सोडली. भावांना शाळेत जायला मदत केली. भावांचाही तिच्यावर खूप जीव होता. शाळेची पायरी न चढताही माझी आजी व्यवहाराने खूप हुशार होती.

मला राहून राहून आजीची एक गोष्ट आठवते. जेंव्हा जेंव्हा ती मला भेटायची तेंव्हा गळाभेट घ्यायची, आणि माझ्या गालाचा पापा घ्यायची पण तो पापा जरा वेगळ्या प्रकारचा असायचा. वेगळ्या प्रकारचा म्हणजे, तिचे वय जास्त असल्यामुळे दात नव्हते. त्यामुळे ती जेव्हा माझा पापा घ्यायची, तेव्हा माझा पूर्ण गाल ओला व्हायचा. मला खूप वेगळं वाटायचं आणि चिडचिड पण करायचे. पण खरं सांगू का? आता तसा पापा घ्यायला ती नाही, ही कल्पना घाबरून टाकते. आता कोण घेणार माझा तसा पापा? नाहीच... त्याला माझी आजीच पाहिजे... मी पुढच्या जन्मामध्ये कोण असेल मला माहित नाही... पण माझी आजी म्हणून मला हीच आजी पाहिजे.

माझ्या आजी-आजोबांना चार मुले – तीन मुली एक मुलगा. आम्ही कोल्हापूरला असतो, पण माझी मम्मी जेंव्हा जेव्हा वेळ मिळेल, किंवा काम बाजूला ठेवून पंधरा दिवसातून किंवा आठवड्यातून आजी-आजोबांना भेटायला जायची. मग तिला कितीही त्रास होऊ दे. मम्मी, मावशी आणि मामाचं रडणं बघून मला काळीज वर आल्यासारखं वाटायचं. मी खूप घाबरून जायचे. मीही त्यांच्याबरोबर खूप रडायचे. आजी तू गेलीस, एक खूप मोठी पोकळी निर्माण झाली आहे.

आजी आणि मी जेंव्हा जेंव्हा एकत्र झोपायचो तेंव्हा ती रात्रभर बोलायची, खेळकर होती, विनोदी होती. ऐकणाऱ्याला कंटाळा येऊन तो माणूस झोपी जाई, पण आजीची गोष्ट संपायची नाही. आजी तू निघून गेलीस... पण आजोबांचा आधार....? त्यांना ''जेवलात काय?'' म्हणून कोण विचारणार? तू गेल्यापासून... आजोबा असूनही नसल्यासारखे आहेत, प्रत्येक मिनिट तुझ्या लावलेल्या फोटोकडे टक लावून बघत असतात, आणि 'ती परत येणार.' असं म्हणत असतात....

मी बारावीत शिकत होते. माझी बोर्डाची परीक्षा चालू होती. शेवटचा पेपर होता, मला त्या पेपरपेक्षा माझ्या भावना कागदावर उतरवणं जास्त महत्त्वाचं वाटतं. म्हणून लिहित आहे. मी १४ मार्चला रात्रभर तळमळत होते, कारण तेंव्हा माझी आजी आम्हाला सोडून जात होती, पण मला ते कळून वळलं नाही. १५ मार्च ला सकाळी ६.३० च्या दरम्यान फोन आला. आजी गेल्याचं कळलं.

माझी परिस्थिती अशी होती की माझा बारावीचा बोर्डाचा पेपरपण चुकवला असता, कारण मला आजीला शेवटचं बघायचं होतं. पण आपल्या शैक्षणिक कामामध्ये माणसांच्या भावनांपेक्षा रिकाम्या कागदाला जास्त महत्त्व दिलं जाते. मी काळजावर दगड ठेवून पेपरचा अभ्यास करत बसले. मम्मी-पप्पा गावी, मालव्याला गेले. जाताना मम्मी मला म्हणाली, ''मी जात आहे पण तू घाबरू नकोस! जिद्दीनं सामोरी जा! परिस्थितीला घाबरायचं नाही, रडत बसायचं नाही!''

मी संयमाने, मनावर मोठा धीराचा दगड ठेवून पेपर दिला आणि लगेच गावी गेले. पण मला आजीला शेवटचं बघता आलं नाही. कदाचित माझ्या ते नशिबातच नव्हतं. तिथे तेव्हा मला ती नाही, तर तिच्या फक्त आठवणी स्वरूपातील वस्तू दिसल्या,

''आजे! तू गेलीस पण तुझी पोरं आणि नातवंडं पोरकी झाली.''

घरातील सर्व रडत होती, आणि मीपण ओक्साबोक्सी रडत होते.

आता मी गिझरचं कनेक्शन ऑन केलंय, पाणी तापलंय, आजी माझी आंघोळ राहू दे... तुझी आंघोळ होऊ दे, मी छळवाद नाही मांडणार, फक्त देवघरातला दिवा पेटत राहू दे एवढं सामर्थ्य मला दे, तुझ्या नातीला एकदातरी कुशीत घे आणि तिचं कौतुक कर, आजी... कोण भरून काढेल तुझी जागा...? कुठे आहेस तू...? मी तुला प्रत्येक माणसामध्ये, झाडांमध्ये, वेलींमध्ये आणि प्राण्यांमध्ये शोधतेय, अगं... आजी, ये ना... बोल की गं! सापडशील ना मला...? तुझी लाडकी संयोगिता... तुझी नात.....

◆◆

# पराया प्यार ...

तुम्हें खोना दिल को नामंजूर है,
लेकिन तकदीर में तो यही लिखा है ।

तुम्हारी जुदाई का गम सहना,
शायद यही मेरी सबसे बड़ी सजा है ।

कैसे भूल पाऊँगी मैं उन लम्हों को,
जो साथ तुम्हारे बिताए थे ।

वक्त यूँ ही चलेगा ऐसा सोचकर
क्या-क्या सपने सजाए थे ।

दिमाग बार-बार कहता रहा कि
''वह नहीं है तुम्हारा...''
फिर भी नादान दिल उसी को
मानता रहा अपना सहारा ।

अब और क्या लिखूँ उसपे?
वह तो एक सपना है,
जो किसी और का होते हुए भी
मैंने उसे चुराया है ।

प्यार से भी ज्यादा खूबसूरत
रिश्ता है हमारे बीच में,
जो फिलहाल तो इस दुनिया
के लिए अनजान है ।

अब एक मोड़ पर आकर
ठहर गई है यह जिंदगी,
जहाँ ना तुमसे खफा हो सकते हैं,
ना ही तुम्हें बेवफा कह सकते हैं ।

बस तुम अब जिसके भी हो
उसके साथ खुश रहना ।



पूजा कोलकार
बी.ए. भाग-दो

# तेरी दुनिया हूँ मैं ...

तेरी पलकों में लिपटी हुई
आँधी हूँ मैं,
छिप - छिप के तुम्हें देखनेवाली
चोर हूँ मैं,
तुम थक गए तो
तुम्हें हौसला देने वाली परी हूँ मैं,
आप पर कोई संकट आए
तो उस संकट में,
आपके साथ लड़ने के लिए
हमेशा तुम्हारे साथ
रहने के लिए
बेताब मणिकर्णिका हूँ मैं ।
जब तक साँस चले
उस साँस को आपको
सौंपने का वचन निभाती
एक साधारण लड़की हूँ मैं,
लेकिन...
राक्षस जैसे लोगों को
जलाने और जमीन
में मिटाने को हमेशा
तत्पर रहने का
वचन देने का काम
करती हुई इक्कीसवीं सदी
की प्यार और क्रोध
का रूप साथ
लेकर जन्मी हुई नारी
हूँ मैं ।



संयोगिता संजय पाटील
बी.एस्सी. भाग-दो

# चंद्रमा

तारों को देखकर बड़ी हूँ
उन्हें देखकर ही खड़ी हूँ
सितारे का कहना है
हमें उनसे मिलना है ।

भारत कर रहा है हर प्रयास
हमारे चंदामामा के नजदीक जाने का
चंद्रमा तक हम जाकर रहेंगे
हमारा तिरंगा वही लहराएँगे ।

चंद्रयान चंद्रमा से मिलने
के लिए बेकरार है
उसके साथ हम सभी
भारतीयों का भरोसा, मेहनत और प्यार है ।

चंद्रमा पर हमारी बस्ती जरूर बसाएँगे
साथ में धरती को
साफ-सूथरा रखने का
वचन निभाएँगे ।

विक्रम से हमारा संपर्क टूटा है,
संकल्प नहीं,
मेहनत से फिर
प्रयास करेंगे ।

वही सफलता सही
इसरो करेगा
हमारे सपनों को साकार ।



- संयोगिता संजय पाटील
बी.एस्सी. भाग-दो

# क्या उसे पता है ...

जिस चीज को दिलो जान से चाहा
जिसके लिए ता-उम्र तड़पे
क्या उसे पता है ...
उसकी एक झलक के लिए
हम कितने तड़पे ...

क्या उसे पता है ...
सारी रात जाग कर
उसकी यादों में
मैंने कितना सुकून पाया है ...

क्या उसे पता है ...
उसकी हर बात को
उसके हर सुकून को
कितनी सिद्दत से
जताया है ...

क्या उसे पता है ...
क्यों यह दिल बार - बार
सिर्फ उसे ही ढूँढता है ।
बिना कहे ही वो
नजरों के सामने
चला आता है ...

क्या उसे पता है ...
इस मासूम-सी
महोब्बत के बारे में ...
क्या उसे पता है ...!



धनश्री दिनकर शिंदे
बी.ए. भाग-तीन

# When Things are not Moving

And you don't know where your life going.
When you see that passage at the bend.
But you don't know where this will end.
When you are confused and scared.
And feel like you have been in a scarred.
That is a when it's time to halt.
And remember it's not your fault.
Things will eventually fall in place .
Just be positive and give everything.
Some space...

**Aishwarya Akaram More**
B.Sc.III

# Life is nothing but...

A Bitter sweet musical,
the song and dance routine you follow,
the emotions but that you swallow,
the twits and turns in the plot,
and the moments that you got,
the Epic fails of some scenes,
and the drama that goes off screen,
the sad and funny moments,
that unheading blabbering comments,
life is nothing but a musical,
the one where you are special...



**Aishwarya Akaram More**
B.Sc.III

# Love

A memorable,
satisfactory, lovable
Feeling in the world is Love...

Love makes U complete,
It makes you meaninfgul.
It is not attraction of anything,
It is soul, happiness...

Dosen't matter your love is
with U or Not,
It matters when ur love is
not feeling satisfactory, loyal,
faithfull with U...

Every person has their own past,
past gives you experience to
deal with ur present and
present is helpful to decide
your future,
In life, Love what you do and
do what you like...



**Sanyogita Sanjay Patil**
B.Sc. II

# शारदाया सफलता ।



संयोगिता पाटील
बी. एस्सी. भाग–दोन



एकं ग्रामम् अस्ति । तत्र 'शारदा' नाम एका बालिका वसति । सा पाठशालायां पठति स्म । सा अतीव चतुरा आसीत, परीक्षासु अत्युत्तमानमकान् प्राप्नोति स्म । एवं दशमकक्षापर्यन्तं पठितवती । अनन्तरं तस्य विवाह अभवत् । तस्याः पतिः भारतीय सेनादलेअधिकारी आसीत् । तस्य वयः तदा चतुःविंशतिः आसीत् ।

विवाहानन्तरं कतिचनमासानाम् अनन्तरं शारदा पत्युः गृहं प्रस्थितवती । पतिगृहे जीवनक्रमः पितृगृहस्य, जीवनक्रमात् भिन्नः । पतिगृहे पाकः पात्रक्षालनं वस्त्रक्षालनं गृहमार्जनम् इत्यादिषु कार्येषु सा एव क्रियते । पत्युः गृहे अन्य सदस्याः सन्ति । कार्यकरणं सेवाकरणे अभ्यासहीनया । शारदया कृतेषु कार्येषु सेवासु दोषाः भवन्ति स्म । अतः सा बहुवार अपहासस्य पात्रं भवन्ति स्म । तेषां परिहासः केवलं परिहासार्थ भवति स्य, न तु तस्याः अवमानन कर्तुं वा ।

एवं सन्तोषेण वर्षद्वयम् अतीतम् अनन्तरं सा ऋतुमती अभवत् । सा नवमे मासे स्त्रीशिशोः जननमभवत् । एषा वार्ता शारदायाः पत्युः गृहं प्रति प्रेषितवान् । तदा तस्याः पत्युः तथा अन्यजनाः अतीव मोदं प्राप्तवन्तः । शिशोः जातकर्म अभवत् । तस्याः नाम 'कोमल' इति स्थापितम् ।

तदनन्तरम् वर्षत्रयम् अतीतम् । तदा सा पुत्राय जन्म दत्तवती । तस्य नाम 'आनन्दः' इति स्थापितम् । एतावत् सर्वं अतीव सुलभं, सुकरं गच्छति स्म । किन्तु शारदायाः पतिः अकस्मात् युद्धभूमेः, मृतः । तदा शारदा अतीव दुःखिता भवति स्म । परं द्वौ आपत्यार्थं सा निर्णयं कृतवती । अग्रं अहं क्रेनचित् कर्य करोमि तथा मम परिवारस्य, उदरनिर्वाहं करोमि । इति मत्वा सा एकास्मिन 'बचत गटस्य' सहाय्येन नैकविधानि वस्त्राणि विक्रयणस्य कार्यम् आरब्धवती । शनैः सा उदरनिर्वाहस्य साधनं प्राप्तवती । द्वादर्शवर्षानंतरं सा एकं स्वस्थ आपणं उद्घाटयति स्मां तत्र सा व्यवसायः कृतवती । यदा तस्य पुत्रः आनन्दः द्वादशीकक्षापर्यन्तं शिक्षण पूर्णम् अकरोत् तदा सा मातुः अवदत् 'अहमपि पितुः समानम् अस्माक देशस्य रक्षणार्थं सेवा कर्तुम इच्छामि' किन्तु तस्यार्थ तव अनुमतिः आवश्यकमस्ति । तदा शारदा तस्मै अनुमति दत्ता । चतुः वर्षानंतरं सः पुत्रः अग्रिमं शिक्षणं पूर्णम् अकरोत् । तथा अधिकारी पदम प्राप्तवान् ।

शारदायाः पुत्री अपि 'अभियान्त्रिक' पदवी प्राप्ता । सा अपि पुण्यपत्तने नामांकित औद्योगिक यन्त्रागारे सेवा करोति स्म । तस्याः अपि विवाह शारदा अकरोत् । एतादृशी सामर्थशालीनी शारदा तस्याः जीवने साफल्यं प्राप्तवती । तथा पुत्रौ संगोपनमपि सम्यकताया कृत्वा तयोः जीवन सार्थक कृतवती । विविधानी संकटानि अपहृत्य सा बुद्धिचातुर्येन बाहुल्येन तस्याः परिवारस्य उत्कर्षं अकरोत् । अतः धन्या सा शारदा माता ।





## विवेक २०१९-२०

दि प्रेस रजिस्ट्रेशन ऑफ बुक ॲक्ट - नियम ८ फॉर्म ४ प्रमाणे निवेदन

- **प्रकाशन स्थळ** : विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)
- **प्रकाशन काळ** : वार्षिक
- **प्रकाशकाचे नाव** : प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर
- **राष्ट्रीयत्व** : भारतीय
- **पत्ता** : विवेकानंद कॉलेज, ताराबाई पार्क, कोल्हापूर - ४१६ ००३, मो. ९४२१११३४५३
- **संपादकाचे नाव** : प्रा. भाऊ काशिनाथ गोसावी
- **राष्ट्रीयत्व** : भारतीय
- **पत्ता** : विवेकानंद कॉलेज, ताराबाई पार्क, कोल्हापूर - ४१६ ००३ मो. ९४२३२७०९४७
- **मुद्रक** : श्री. प्रदीप शंकरराव पडवळे
- **पत्ता** : श्री मुरारी मुद्रणालय, वाय.पी.पोवार नगर, कोल्हापूर. मो. ९८९०१७७०७७
- **संगणक/अक्षर रचना** : श्री. सुनील धोंडीराम सुतार
- **राष्ट्रीयत्व** : भारतीय
- **पत्ता** : सृजन डिझाईन, निवृत्ती चौक, कोल्हापूर कोल्हापूर. मो. ७२७६०३६६६४
- **स्वामित्व** : विवेकानंद कॉलेज, ताराबाई पार्क, कोल्हापूर - ४१६ ००३

मी प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर जाहीर करतो की, वरील माहिती माझ्या माहिती व समजुतीप्रमाणे सत्य आहे. या अंकातील मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखनाची निवड, संपादन व मुद्रित शोधन विभागीय संपादकांनी केलेले आहे. खाजगी वितरणासाठी.



"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार"
–शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे



मातीतूनी उमले मोती
ती माती लावूनी भाळी,
ज्ञानाच्या शेतमळयातूनी
पिकती माणिकमोती.

ते भाग्य लाभले तुम्हां...
ज्ञानाची मशाल हाती,
शिक्षणव्रत घेवूनी चालता
उजळती लक्ष दिव्यांच्या ज्योती.



७५
अमृतमहोत्सव



